# माझ्या आयुष्याची गोष्ट

गिरिजा कीर

रिया पब्लिकेशन्स्

**माझ्या आयुष्याची गोष्ट (आत्मचरित्र): गिरिजा कीर**

© **गिरिजा कीर**
५, झपूर्झा, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
दूरध्वनी : २६५९१०८४/२६५९०८८२

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ४००/-

# माझी भूमिका

मी माझ्या आयुष्याची गोष्ट लिहायला बसले आहे. गोष्टच ! मी गोष्टी लिहिणारी आणि सांगणारी बाई आहे; पण ही गोष्ट कल्पनेतली नाही. एखादं बीज गवसलं वगैरे नाही. ही मी पाहिलेली, अनुभवलेली गोष्ट आहे. आत्मचरित्र !

अनेक वर्षं हे माझं आयुष्य मला सांगत होतं, लिही. माझ्यावर, म्हणजेच तुझ्या सुखदुःखांवर, तुझ्या भोगवट्यांवर, तुझ्या अनुभवांवर, अंगावर उठलेले ते सगळेच दुःखाचे वळ... मी ते सगळं त्याच ताजेपणानं आणि त्याच आचेनं आता लिहू शकेन? जे जे जसं जसं घडलं तसं? आणि मी थांबले. अनेक वर्षं ! कदाचित घाव ताजे असताना मी सगळं लिहिलं असतं खरं; पण ते एकांगी झालं असतं. माझी प्रतिमा झळझळीत करणारं आणि संबंधितावर अन्याय करणारं, सूड घेणारं.

आता या वयात- (गेली अनेक वर्षं हे मी लिहिते आहे, म्हणून वयाचा नक्की आकडा घातला नाही.) मी थोड्या अलिप्तपणानं, थोड्या थंड मनानं आणि थोड्या परिपक्व जाणिवेनं लिहिते आहे. माझ्यावर अन्याय करणाऱ्यांची, मला दुःख देणाऱ्यांचीही काही बाजू असू शकेलच.

मग ही आयुष्याची गोष्ट नुसत्या, 'गिरिजा कीर'च्या आयुष्याची गोष्ट रहातच नाही. ती, रमादेवी नारायणराव मुद्वेडकरची गोष्ट आहे; ती गिरिजा कीरची गोष्ट आहे आणि या दोहोंपासून अलग पडलेल्या 'माझी' गोष्ट आहे. कालप्रवाहातून फरफटत गेलेल्या, प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचा प्रयत्न करणाऱ्या, नशिबाचे फटके खाणाऱ्या आणि तरीही हार न मानता उत्साहानं जीवनाला सामोरे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका स्त्रीच्या आयुष्याची ही कहाणी आहे.

गेल्या ६०-६५ वर्षांचा कालपट-त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक (आणि कौटुंबिकही) संदर्भासह त्यात अपरिहार्यपणे डोकावला आहे. देश आणि कोकण

यातल्या भिन्न संस्कृती, मुंबापुरीचं अफाटपण आणि पुणेरी अटकर नेटकेपण, त्याच्या मर्यादांसकट डोकावलं आहे. ज्या विविध अनुभवांतून मी गेले आहे ते अनुभव समाजातल्या अनेक थरांतल्या स्त्रियांशी साधर्म्य सांगणारे आहेत आणि स्त्री आली की त्यात कुटुंबही डोकावतंच. त्यामुळे हे आत्मचरित्र कुणालाही जवळचं वाटावं असंच आहे.

आज माझं मलाही आश्चर्य वाटतंय, मला आत्मचरित्र का लिहावंसं वाटलं?

मी अनेकांची आत्मचरित्रं वाचली आहेत. 'आठवणी' या सदरात मोडणारं आत्मपर लेखनही वाचलंय. जुन्या लेखिकांतली लक्ष्मीबाई टिळक, शीलवती केतकर, रमाबाई रानडे, आनंदीबाई शिर्के ही काही नावं वगळली तर बाकीच्या आत्मचरित्रांनी मला फार पेचात टाकलंय. 'आत्मचरित्र' नक्की कशाला म्हणायचं हाच प्रश्न मला पडलाय.

आत्मचरित्र म्हणजे, जीवनातल्या सूड-नाट्याचा इतिहास? आत्मचरित्र म्हणजे, आत्मप्रौढीचं कलात्मक प्रदर्शन? प्रेमप्रकरणांचं केलेलं उदात्तीकरण? निकटवर्तियांचा पंचनामा? नेमकं कशाला आत्मचरित्र म्हणायचं? गेली कित्येक वर्षं मी या भोवऱ्यात सापडले आहे. जेव्हा केव्हा हा विचार मांडताना मी आत्मचरित्र न लिहिण्याचा विचार प्रकट केला, तेव्हा अनेकांनी अनेक तऱ्हेच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

एक पत्रकार म्हणाले, 'बाई, तुमच्याजवळ सांगण्यासारखं खूप आहे, पण तुम्ही नेमकं तेच लपवता. एकदा सगळे मुखवटे प्रकाशात आणा-' मी फक्त हसले.

कारण या अनेक मुखवट्यांत एक माझाही मुखवटा असतो. तो बाजूला करताना त्याचं विच्छेदन कुणी करायचं? मी न्यायाधीशाच्या भूमिकेतून कुणाकुणावर आसूड उगारू? आत्मचरित्राचा तेवढाच गंभीर हेतू असतो काय? सामाजिक ढोंगांचा जाहीर धिक्कार करताना, सामाजिक ऋणही लक्षात ठेवायला नकोत काय?

सनसनाटी लिहून आपल्या पुस्तकाकडं लोकांचं लक्ष वेधून घेणं हे मी पीतपत्रकारितेइतकंच हीन दर्जाचं समजते. मला काहीही चटपटीत आवडत नाही.

एक प्राध्यापकस्नेही एकदा म्हणाले होते, 'बाई, तुम्ही खरंच लिहा आत्मचरित्र. किती विविध अंगांनी तुम्ही आयुष्य अनुभवलंय ! तुम्ही खूप काही देऊन जाल.' मी माझ्याच तंद्रीत म्हणाले, 'होय सर. हे सगळे भोगवटे जगापुढे यायला हवेत असं मलाही वाटतं. एखाद्यानं भोगायचं तरी किती ! पुन्हा त्याचा उच्चार करायचा नाही-' ते एकदम म्हणाले, 'बाई, तुम्ही अनुभव, 'अनुभवां'च्या पातळीवर लिहा. एक त्रयस्थ म्हणून. आयुष्य ही रंगभूमी समजून. तुम्ही फक्त सूत्रधार व्हा. 'गाभाऱ्यातली माणसं'ची लेखिका क्षमाशील आहे. जीवनाचं सुंदरपण जाणणारी आहे. त्याला धक्का न लावता तुम्ही एक चिरस्मरणीय अशी कलाकृती जन्माला घाला. तुमच्या लेखणीत ती ताकद आहे.' याही मतावर मी फक्त हसले. माझी एक इमेज तयार करून ते जपणारी लेखिका मी व्हावं ही भूमिका मला पटणारी नव्हती. मी 'मी' म्हणूनच वाचकांपुढे यावं. तिथं कसली पुटं चढवलेली नकोत. कसले आग्रह, हट्ट नकोत, कुठले पूर्वसंकेत नकोत. कुठलं मोठेपणाचं दडपण नको आणि कुणाची अकारण भीती नको. कोणत्याही अन्पार्लमेंटरी शब्दांची किंवा प्रसंगांची पेरणी करून मला गाजायचं नाहीय, किंवा 'धीट' लेखिका ही पदवी पदरात पाडून घ्यायची नाहीय.

माझ्या मनाची कवाडं मला उघडाविशी वाटतात. मी उघडते आहे. त्यातलं आठवणींचं, अनुभवांचं, भोगवट्याचं गोंदण तुम्हाला पाहाता येणार आहे.

जे चित्र काळाच्या पटावरून पुसलं गेलंय आणि जे मला आज अर्थहीन वाटतंय ते आता मालमसाला घालून गिरवावं असं मुळीच वाटत नाही.

मग प्रश्न उरतोच, 'तर हे सगळं लिहितेस कशाला? एका वाक्यात सांगू? लिहावंसं वाटतं म्हणून ! हे लिहून मी 'मोकळी' होणार आहे.'

'वैश्विक' हा अति उदात्त आणि भव्य शब्द आजकाल गल्लीबोळांतून पण वापरला जातोय, म्हणून मी तो टाळतेय. मला स्वत:ला माझ्या सामान्यपणाची जाणीव आहे. सामान्यांचं सुख-दु:ख मी जगलेय. गरिबीकडे मी नजर भिडवून पाहिलं आहे, अपयशाचा अर्थ गळी उतरवला आहे, अन्याय तोंड दाबून सहन केला आहे आणि जेव्हा त्याचा उच्चार केला तेव्हा माझंच तोंड बंद केलं गेलंय. या सगळ्यांतून तर आपण घडत असतो. जगण्याचा अर्थ समजून घेत असतो. इथं मी त्याचा प्रामाणिक उच्चार केला आहे.

मी अमुक तारखेला जन्मले आणि जगता जगता एक दिवस म्हातारी झाले असले निरूपयोगी तपशील म्हणजे आत्मचरित्र असं मी मानत नाही. मला जे टप्पे महत्त्वाचे वाटले, ज्यांच्याकडे वळून बघताना थांबावंसं वाटलं, विचार करावासा वाटला ते सगळं मी आपल्यापुढं ठेवलं आहे.

या आत्मचरित्राचे मी पाच भाग केले आहेत: शाळेचे दिवस, कॉलेजचे दिवस, मधले दिवस, मावळतीचे दिवस, शेवटी फक्त लेखिका आणि शेवट नसलेल्या शेवटाकडे.

तो तो कालखंड, त्या त्या वयाची भाषा, विषय; विचार करण्याची पद्धती लक्षात घेऊनच लिहिला आहे. शाळेतली मी, उतार वयातला प्रौढपणा घेऊन लिहिणार नाही. त्या वयातलं शहाणपण आणि खुळेपणही लक्षात यायला हवं. मी कुठेही उदात्तीकरण केलेलं नाही.

माझ्या बालपणीचं सामाजिक, कौटुंबिक वातावरण, राजकीय रंग-ढंग आणि त्याचे जनजीवनात उठलेले साद-पडसाद, तेव्हाच्या समजुती; कॉलेज जीवनातल्या सांस्कृतिक घडामोडी, तेव्हाचं वातावरण, एक विद्यार्थिनी म्हणून मी टिपलेले बारकावे, तेव्हाचे गुरुजन, (शिक्षक नव्हेत) हे सगळं आजच्या पिढीपुढं ठेवणं मला फार आवश्यक वाटलं.

'मधले दिवस' हा आयुष्यातला गाभा. एका बाजूला संसार, त्याची पडझड आणि दुसऱ्या बाजूनं, त्या राखेतूनही फुंकर घालून निखारा फुलवण्याची जिद्द; करिअर करण्याची इच्छा बाळगणाऱ्या तरुण मुलीच्या जीवनातले अडथळे या सगळ्यांतून ३५-४० वर्षांपूर्वीचं स्त्री-जीवन उभं रहातं. मी अनेक प्रश्नही सर्वांसमोर मांडले आहेत. विचार करण्यासाठी; कारण आजही ते प्रश्न धगधगते आहेत. मध्यम आणि कनिष्ठ मध्यम वर्गातल्या स्त्रियांना भेडसावणारे आहेत. त्यामुळं हे आत्मचरित्र बऱ्याच अंशी सामाजिक आणि कौटुंबिक प्रश्नांना वाचा फोडतं.

कुठल्याही समस्येचा, 'समस्या' म्हणूनच स्वतंत्रपणे विचार व्हावा. ती कुठल्या थरातून वा जातीपातीतून आली आहे असले प्रश्न मी गौण मानते.

माझ्या मते ढोबळ भेद म्हणजे, स्त्री-पुरुष आणि गरीब-श्रीमंत. आपले सगळे प्रश्न त्या भोवती घुटमळत असतात. त्यातूनच निर्माण होतात, त्यातच खदखदत रहातात.

या आत्मचरित्रात चटकदार किंवा भावना उद्दीपित करणारं काहीही नाही, तत्त्वचिंतनात्मक किंवा बोजड शब्दांतून बुद्धीची कसरत दाखवणारंही काही नाही. आहे ते जगणं, जगण्यासाठी झगडणं, हरणं, जिंकण्यासाठी पुन्हा उभं ठाकणं, हताश होणं, निराश होणं तरीही धडपडून उठणं; कारण शेवटी 'सन्मानानं जगायचं आहे' ही प्रबळ इच्छा ! हा सगळा आशा-निराशेचा डाव माझ्या वाचकांना निश्चित जवळचा वाटेल. गेली ४० वर्षं त्यांचं माझं हे शब्दांचं नातं आहे.

मला एकच प्रश्न पुन्हा पुन्हा सतावतो तो हा की, माझ्या आयुष्याची कथा मी पूर्णार्थानं आणि पूर्णांशानं लिहू शकते? माझ्या जन्माविषयी मला काहीच ठाऊक नसतं. ती ऐकलेली हकीकत असते आणि माझ्या मृत्यूविषयी? ते इतरांनी बोलायचं असतं किंवा विसरून जायचं असतं. म्हणून मी म्हणते, ही हकीकत हा माझ्या जाणिवेचा प्रवास आहे.

मी जे जगले ते, शब्द न् शब्द तर नाही लिहू शकत. त्याला अर्थही नाही. महत्त्वाचे संदर्भ, महत्त्वाचे टप्पे, घटना, अनुभव यांची ही जास्तीत जास्त प्रामाणिक नोंद. जे नोंदवणं अनावश्यक वाटलं ते मी गाळलं आहे. ज्यातून माझ्या जीवनानं आकार घेतला आहे. (कुठे मोड-तोड झाली आहे) त्या त्या गोष्टींचा इथं उल्लेख आहे. प्रामाणिक !

काही ठिकाणी अपरिहार्यपणे आत्मस्तुती झालीही असेल. शक्यतो अशा जागा मी टाळल्या आहेत. काही ठिकाणी परनिंदा झाली असेल तर ती नाइलाजानं. तेही मी जाणीवपूर्वक टाळलं आहे. कुठचाही गरमागरम मालमसाला घालून त्याचं भडक प्रदर्शन करणं माझ्या स्वभावात नाही.

आयुष्याच्या संध्याकाळी केलेलं हे आत्मपरीक्षण आहे. हा स्वत:शी केलेला संवाद आहे. 'ही मी अशी आहे-अशी जगले !' हा यातला महत्त्वाचा दुवा आहे.

आयुष्याच्या या लांबलचक प्रवासात ज्यांनी मला घडवलं, मला काही काळ तरी आनंद दिला, माझं आयुष्य सुखी करण्याचा प्रयत्न केला त्यांची मी ऋणी आहे.

ज्यांनी मला दु:ख दिलं, त्रास दिला त्यांचेही मी आभार मानते. अशाकरता की, त्यांनी मला आयुष्याचा अर्थ समजायला मदत केली.

तर आता, 'माझ्या आयुष्याची गोष्ट !!'

✦ ✦ ✦

## थोडं आधीचं–

**मी** कोण, कुठली, कुठून आले, कुठं घडले, कुठं वाढले हे सांगणं मला आवश्यक वाटतं. त्याकरताच हे थोडं आधीचं–

तशी माझ्या आठवणींची सुरुवातच प्रवासापासूनची आहे–

अंधूक अंधूकसं आठवतं– गप्प्गार काळोख होता. पावसाचे बोराएवढाले थेंब एस. टी.च्या छताच्या पत्र्यावर टाप् टाप् आवाज करत नाचत होते. खिडक्यांना मेणकापड सोडलं होतं खरं; पण ते वाऱ्याच्या सोसाट्यानं उडत होतं. त्या प्रत्येक फटक्यासरशी पावसाचा सप्दिशी सप्कारा बसायचा. अंगातल्या गरम कोटाला न जुमानता पाणी अंगाला झोंबायचं. ओलं किच्च वाटायचं. पायाखाली तळं झालं होतं.

माझ्या मनाचा ससा झाला. आता काय होईल? काडऽ् काड्ऽ कडाड्ऽऽ काडऽ् आवाजानं कानाचे पडदे हलले. वाटलं, एस. टी.चं छप्पर उडून गेलं. जीव लकलकला. हे असं किती वेळ चालणार? एस. टी. लवकर का सुटत नाही? सुटली तरी नीट जाईल? कुठं जाईल ती? आपण कुठं चाललोय...? तेवढ्या पावसाला छेदत मोठ्या आवाजात हाका आल्या–

‘नारायण... नारायण... ना...’

‘हां व्यंकण्णा, मी आहे इथं. आलो आलो–’

मी दादांचा हात घट्ट पकडत म्हटलं,

‘तुम्ही खाली उतरणार?’

‘व्यंकण्णा आलाय. त्याला भेटून येतो.’

‘मीपण येते दादा–’

माटूनं खालच्या आवाजात दरडावलं,

'तू कुठे तडफडतेस पावसात?'

मी माटूकडं दुर्लक्ष केलं अन् दादांच्या हाताला धरून पुढे झाले.

दारालगत तात्या उभे होते.

'व्यंकण्णा तू आलास?'

'हो. नको यायला? तू बाहेर पडलास-'

'घरी राहिलो तर बायकांची भांडणं. त्या दोघींचं पटणार नाही. काय करणार? मुलांची व्यवस्था लावली पाहिजे-' दादांचा आवाज जड वाटत होता. पावसामुळं का?

कंडक्टरनं इशारा दिला. तात्या गडबडीत म्हणाले, 'नीट रहा. जपून रहा. मी येत जाईन. 'त्या' काही बोलल्या तरी तू मनावर घेऊ नकोस. मुलांना मोठं कर. जप.'

दोघांनी कडकडून मिठी मारली. आता बाहेरचा पाऊस दोघांच्या डोळ्यांतून कोसळत होता. एस. टी. हलली.

'दादा-' मी दादांना हळूच बिलगत हाकारलं.

'काय बाळ?'

'आता आपण कुठं चाललोय?'

'कोल्हापूरला-'

'कोल्हापूर कसं आहे?'

'छान आहे. शहरगाव आहे. मी, व्यंकण्णा, आमचे अण्णा-आम्ही सगळे इथंच शिकलो. आपण मूळचे इथलेच.'

'मग इथून धारवाडला का गेलो?'

'कारण इथलं सगळं गेलं, घर, वाडे, शेत-'

'गेलं म्हणजे?'

'म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात गेलं. जाळलं...'

'कुणी केला वाद?'

'माथेफिरू लोकांनी.'

'मग तिथंच पुन्हा कशाला जायचं?'

आपल्याला राजाराममहाराजांनी बोलावलंय. 'तुमचं जुनं सगळं देऊ. तुम्ही मूळचे रहिवासी. गाव टाकू नका. सन्मानानं रहा म्हणाले.'

'महाराज चांगले आहेत?'

'भला माणूस आहे.'

मला केव्हातरी दादांच्या मांडीवर झोप लागली.

मी उठले तेव्हा कुठल्या तरी घरात होते. रात्रीच मला कुणीतरी इथं आणून झोपवलं होतं. मोठा दिवाणखाना. प्रशस्त माजघर. बेताचं स्वयंपाकघर. बाजूला कोठीची खोली. तिला म्हणे 'उंदराची खोली' म्हणायचं. मग छोटंसं अंगण. आणखी एक गम्मत होती-

घराशेजारी एक गोरी गोरी छान बाई होती. दोन लांबसडक वेण्या घालायची. नाजूक नाजूक हसायची. हसली की, गालाला छान खळी पडायची. ती बहुतेक अप्सरा असावी. मला ती फारच आवडली. तिचं नाव 'आशालता' होतं. ती सिनेमात काम करायची म्हणे.

समोरच्या चाळीत मिरजकरांचा राम्या होता. तो कमरेत मोडल्यागत चालायचा. त्याच्या चाळीच्या बाजूला मारवाड्यांची चाळ. मग शिरगुप्पीकरांचा बंगला. समोर लिफ्टन मान्यांची बंगली. बाजूला पुन्हा चाळ. आमच्या डाव्या हाताला महेकरांचा वाडा होता आणि त्याच्यासमोर बैठ्या चाळी. मोर्डेकर, लेले वगैरे. खूप मुलं-मुली.

अशा या भरवस्तीत आम्ही रहायला आलो होतो. शानेदिवाणांचा बंगला, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर ! मला कोल्हापूर आवडलं. आमचं घरसुद्धा !

✦ ✦ ✦

# *शाळेचे दिवस...*

शाळेचे दिवस आठवले की, अनेक चित्रं डोळ्यांपुढून सरकतात. काही ठळक घटना, प्रसंग, चेहरे... त्या त्या चेहऱ्याशी संबंधित गोष्टी. आयुष्याच्या उतारालासुद्धा यातलं काही म्हटल्या काही विसरता येत नाही.

तशा वयाच्या पाचव्या वर्षापासूनच्या आठवणी माझ्या मनात ताज्या आहेत. (व्यवहारी अडचणी उत्पन्न व्हायला नकोत म्हणून काही नावं मी बदलणार आहे, एवढंच)

माझं बालपण तसं मोठं सुखात, आनंदात गेलं असं नाही म्हणता येणार. आईवेगळी मी खूप एकाकी, उदास अन् दबलेल्या मन:स्थितीत जगले. कुटुंबाच्या नातेसंबंधातील ताणतणावात माझा आवाज नेहमी खालचा राहिला. आईवेगळी मुलं अशीच एकाकी, पोरकी होत असावीत. आठवणीतल्या पहिल्या दिवसापासून तोच अनुभव आला.

दुपारची जेवणं झाली अन् मी ओळखी काढायला बाहेर पडले.

''समोरच्या बंगल्यात राहायला आलीस?''

"हो !"

"कुणाची मुलगी? इनामदारांची?"

"हो !"

"तुम्ही काय, बंगलेवाले ! आमच्यात कशाला खेळायला आलीस?"

मला काहीच कळलं नाही. आतून एकदम रडायला आलं. मी कसंबसं म्हटलं, "आम्ही बंगलेवाले असलो तरी श्रीमंत नाही, गरीब आहोत-"

बाकीच्या हसल्या. मी बावळट चेहऱ्यानं बघत राहिले.

"तू ये ग रोज खेळायला." एकजण म्हणाली. "चकाचकी खेळू या?"

"खेळू या-"

"ए ती डोक्यावरच्या पदराची बाई कोण ग?"

"ती माटू !" सगळ्या खिदळल्या.

"माटू म्हणजे?"

"म्हणजे आत्या."

"तुला आई नाही?"

"......."

"ए, तुझी आई मेली का ग?"

घशाशी दाटलेला हुंदका एकदम घट्ट झाला. मी कठोर आवाजात म्हणाले, "मरेल कशाला? गावी आहे-" एवढं बोलून मी सगळ्यांकडे पाठ फिरवली अन् घराकडे धाव घेतली.

आपली आई कुठं आहे? ती मुलगी म्हणाली तशी ती खरंच मेली का? का मेली? केव्हा मेली? मेली म्हणजे काय? आपलीच आई का मेली? अनेक प्रश्नांनी मी भांबावून गेले होते. घरी आल्या आल्या माटू म्हणाली, "असा का चेहरा करून आलीस?"

"काही नाही. माटू, आई मरते का ग?"

"मला नाही माहीत आणि लहान मुलांनी अशा मूर्खासारख्या गोष्टी बोलायच्या नाहीत. का? तुला कोण बोललं?"

"कुणीच नाही. मी सहज विचारलं."

रात्री मी शिनूला बोलले, "प्रत्येक माणसाला आई असते का रे?"

"असायलाच पाहिजे. आईच्याच पोटी माणसाचा जन्म होतो."



"मग आपण दोघं दादांच्या पोटी कसे जन्माला आलो?"

"खुळसटच आहेस. दादा आपले वडील. आपण आईच्याच पोटी जन्माला आलो."

"मग आपली आई कुठे आहे?"

"मला नाही माहीत-"

"ती मेली असेल का रे?"

"एऽ काहीतरी बोलू नकोस हं ! आपल्याला मार खावा लागेल." मी एकदम गप्प झाले. "आणि हे बघ, आई, मरणं, असलं काही बोलूच नकोस. लहान मुलाना काय करायचं घेऊन?"

मी गप्प बसले. पण वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षी आई आणि मरण या दोन कूट प्रश्नांनी माझ्या बालपणाला ग्रहण लावलं. मला कळत नव्हतं दमडीसुद्धा, पण विचार करायला लागले आणि हो, त्या दिवसापासून मी रडायला शिकले. दुःखाचा अर्थ कळला म्हणून नव्हे, रडल्यावर बरं वाटतं म्हणून !

✦ ✦ ✦

दुसरे दिवशी चाळीत गेलेच नाही. शेजारच्या महेकरांकडे गेले. स्वयंपाकघरालगतच्या खोलीत मुली शेंगा फोडत होत्या. फोडता फोडता एखादी शेंग कचऱ्यात पडत होती. बाहेरून अण्णा आले. बुटके, गोरे, चेहरा छान, पण महा रागीट. शेंडी वाऱ्यावर भुरभुरणारी. आल्या आल्या ते ओरडले,

"शिंदळीच्च्यांनो, शेंगा फोडता की खेळता? अग ये रांडे, तुझं लक्ष कुठे आहे? हे भोसडीचे वर झोपले असतील आणि..." शिव्यांची रेलचेल. मला भारी मौज वाटली. अण्णा मला एकदम हीरो वाटले. त्यांना बिल्ला वगैरे बक्षीस द्यावा असंही वाटलं. काय फायनाबाज शिव्या देत होते ते. छान ! छान ! त्यांना बघून सगळ्यांची त्रेधातिरपिट उडाली. बायका तर धूम स्वयंपाकघरात पळाल्या. मी धावत धावत घर गाठलं. दादांच्या कुशीत शिरत म्हटलं, "दादा, अण्णा काय फस्क्लास शिव्या देतात-"

"तू देऊन दाखवू नकोस."

"तुम्हाला येत नाहीत ना शिव्या घालायला?"

"येतात. पण त्यांच्याइतक्या जोरकस येत नाहीत."

‘‘फुस् ! मग काय, अण्णा तुम्हाला सहज हरवतील. दादा अण्णांपेक्षा शिव्या घालणारा तरबेज कोणी जगात असेल?’’

‘‘आहे तर !’’

‘‘कोण?’’

‘‘आपले दत्तोबा परीट. क्रियापदं सोडली तर ते सर्व शिव्याच घालतात.’’

‘‘मला न्याल दत्तोबांकडे?’’

दादा हसत म्हणाले, ‘‘नेऊ बरं !’’

‘‘काय नेऊ?’’ माटू कडाडली. ‘‘म्हाताऱ्याला बायकोचे लाड अन् भिकाऱ्याला पोरांचे लाड. त्यांना अभ्यास शिकवा. शिस्त लावा. भलते लाड काय करता दादा?’’

‘‘इंद्राक्का, मुलांना सगळं कळायला हवं. त्यांना अंधारात ठेवू नये. बरं-वाईट त्यांचं त्यांना कळतं आणि लाड करू नको तर काय? आईवेगळी पोर-’’

‘‘दादा- मुलांपुढं हे असं बोललेलं मला मुळीच खपणार नाही. या गोष्टी मुलांना सांगायच्याच का? अशानं ती माझा द्वेष करतील. मग मी कशाला आले तुमच्या घरी?’’ आत्याच्या आवाजात चीड होती. डोळ्यात अंगार. मी हळूच बाजूला झाले. खोलीबाहेर पडले. आडोशाला उभी राहून वादावादी ऐकू लागले. आईवेगळी पोर? आई !

मी घराबाहेर पडले. समोरच्या मारवाड्यांच्या कट्ट्यावर दिवाळी, मोथू, भोमे बेबी, आणखी कोण कोण बोलत होत्या. मला बघून त्या एकदम गप्प झाल्या. त्यांनी सगळ्यांनी मला मधे बसवलं. दिवाळी म्हणाली, ‘‘हिचे केस किती छान आहेत नाही?’’

मोथू म्हणाली, ‘‘गोरी आहे. छान दिसते.’’

भोमे बेबी म्हणाली, ‘‘पुअर गर्ल. ए, तिला ना, आई नाय !’’ मी एकदम उठून उभी राहिले. दिवाळीनं मला हाताला धरून खाली बसवलं. ‘‘ए, बस गं. आम्हाला तू फार आवडतेस. आमच्याकडे खेळायला येशील?’’

‘‘हो.’’

‘‘शाळेला आमच्याबरोबरच येत जा. आमच्या मोटारीनं आपण जात जाऊ.’’

‘‘हो.’’

‘‘तुझे दादा फार चांगले आहेत नाही?’’

‘‘हो. जगात इतकं चांगलं कुणीच नाही.’’



‘‘ए, तुला आई नाही ना ग?’’

‘‘......’’

‘‘ती माटू म्हणजे कोण ग?’’

‘‘आत्या.’’

‘‘ए, या बोडक्या बायका भारी खवीस असतात. ती केवढ्यांदा ओरडत असते. तुला ती छळते का ग?’’

‘‘खूप छळते-’’

‘‘मारते?’’

‘‘मारत नाही. पण रागावते-’’

‘‘तू दादांना चाड्या सांगत जा.’’

‘‘मला भीती वाटते-’’

‘‘अगं, तिचा मानसिक छळ होतो. बिच्चारी ! तू आमच्याकडे येत जा हं बेटा !’’ बेबी भोमेनं माझा गाल कुरवाळत म्हटलं.

मी खुळ्याखुळ्यागत होऊन घरी आले.

‘मानसिक छळ !’ माझा मानसिक छळ होत होता. मला आई नव्हती अन् मी बिच्चारी होते ! म्हणजे काहीतरी वाईट अन् इतरांपेक्षा वेगळं. त्याच दिवशी मी ठरवून टाकलं, या मोठ्या मुलीत आपण चुकूनही जायचं नाही. त्या वाईट आहेत.

चाळीपुढे खेळ चालला होता. मी धावत तिथं पोचले, ‘‘मी येऊ?’’

‘‘ये. पण तुझ्यावर राज्य. चालेल?’’

‘‘हो, चालेल.’’

मी एका खुंटीशी, बाकी सगळ्या समोरच्या खुंटीला. त्या सगळ्या एका बाजूला, मी एकटी एका बाजूला. माझ्यावर राज्य होतं. बाकी पळणाऱ्या होत्या. मी वेगानं धाव घेतली.

खूप वेळानं माझ्या लक्षात आलं की, माझ्यावरचा डाव जातच नाहीय. कुणाला आऊट केलं तरी ती पुन्हा मलाच पकडायची. माझ्यावरचं राज्य जाईना. मी दमले. पण खेळ टाकला तर रडीचा डाव होईल. खेळता खेळता कळत होतं, अंधार पडतोय. मी मधेच ‘थुंऽक्शो’ म्हणून थांबले. डाव्या हाताच्या पालथ्या मुठीवर थुंकले. असं झालं की खेळ थांबायचा.

''का गं थांबलीस?''

''सात वाजले का?''

''वाजले तर काय झालं? आमचा डाव दे.''

''उद्या देईन. मला सात वाजता घरी जायला हवं.''

एवढ्यात कट्ट्यावर बसलेल्या बायकांतली एकजण ओरडली, ''जाऊ द्या गं तिला. तिची आत्या मारेल.'' मुली आपसात कुजबुजल्या, ''तिला आई नाही ना, म्हणून''

मी धावत घराकडे निघाले. धडधडत्या उरानं घरात पाऊल टाकलं. काटा सातवर जात होता. चला, सुटले.

माटूची काहीतरी गडबड चालू होती. घर लखलखीत करणं, चांदीची भांडी काढून ठेवणं, दूध आटवून ठेवणं असंच काही काही. मग कळलं, की उद्या तात्या येणार आहेत म्हणून. मला फारच आनंद झाला. दादांच्या इतकेच तात्या मला आवडायचे. शिवाय तात्या शूर होते. हेऽ भले दांडगे. त्यांच्या मोठ्या मोठ्या मिशा आणि उग्र चेहरा पाहिला की, सगळे दचकायचे. पण त्यांचं बोलणं फार मऊ होतं. खूप मायेनं बोलायचे. खाऊ आणायचे. अभ्यास चांगला केला की बक्षीस द्यायचे. त्यामुळं मला तात्या फार आवडायचे. मुख्य म्हणजे माटू तात्यांना घाबरायची. त्यांच्यापुढं खाली मान घालून उभी रहायची. त्यांना वाकून नमस्कार करायची. असं झालं, की मला वाटायचं, माटूचा पराभव झाला. आता दोन-तीन दिवस तिचा सारखा पराभव होणार होता.

तात्या आले आणि त्यांच्याबरोबर अम्मा पण आली. माझ्या आनंदावर विरजण पडलं. या दोन्ही बायका एकमेकींचा दुस्वास करायच्या आणि कुणाची एकीची बाजू घेतली की दुसरी छळायची. त्या दोघी इतक्या आरडा-ओरडा करायच्या की दिवसभर मी भीतीनं परसाकडे धावायची.

सकाळपासूनचा दिवस बरा गेला. पुरुषमाणसं कामात होती. बायका घरात. रात्रीच्या जेवणाची गडबड चालू होती. लहान-मोठ्यांची एकत्र पंगत. निवांत जेवण. चांदीची ताटं, वाट्या काढल्या होत्या. स्वयंपाक माटूनंच केला होता. ती सुग्रण होती. चवीचं करायची. अप्रूपानं वाढायची. मी फारच खुषीत होते. ताटं मांडली. सुरेख रांगोळ्या काढून झाल्या. उदबत्तीची सोंगटी ठेवली. माटूनं चटणी वाढायला दगडी पुढे घेतली आणि अम्मा कडाडली, ''तू नको वाढूस. पुरुष माणसांपुढे जेवताना कशाला...''



माटूनं दगडी खाली आपटली आणि चुलीतल्या जाळाकडं नजर लावली. तिचे डोळे निखाऱ्यासारखे दिसत होते. ऐन जेवणाच्या वेळेला ह्या दोघी अशा का भांडतायत हे मला कळेना. अम्मानं वाढलं. जेवणं झाली. आता त्या दोघी जेवायच्या, तर दोघीही जेवेनात. माटूचा अपमान झाला होता, आणि अम्माच्या रागाचा पारा चढला होता.

''त्यांना चांदीचं ताट घालून मला पितळेचं घालतेस? माझा अपमान करतेस?''

''तुमचा मान तुम्ही ठेवायचा. तुम्हाला मी चालत नाही ना? मी अपशकुनी. मग माझ्या हातचं जेवण कसं चालतं?''

दोघींचे आवाज चढले. तात्या आत डोकावत म्हणाले, ''तुम्ही जाल तिकडे भांडण कराल. तुम्ही जेवा आणि चला बघू.''

अम्मा कडाडल्या, ''बायकांच्या भांडणात तुम्ही नका लक्ष घालू. ती विधवा. तिनं किती वर तोंड करून बोलायचं?''

एवढ्यात माटूनं गळा काढला. मग दादांनी समजूत घातली. ''इंद्राक्का, काकू, तुम्ही दोघी भांडू नका. तुमच्या भांडणाचा मुलांच्यावर काय परिणाम होईल याचा विचार करा.''

दोघींची शब्दाशब्दी चालूच राहिली. आम्ही मुलं बाहेरच्या दालनात पांघरूण ओढून झोपलो होतो. घरात एकदम सामसूम झालं म्हणून मी कानोसा घेतला. बाहेरचं दार करकरलं. मी खिडकीतून बाहेर नजर टाकली. त्या एवढ्या रात्री दाट अंधारात दादा झपाट्यानं बाहेर चालले होते. पायात वहाणा नाहीत. अंगात घरातले कपडे. शिनू आणि आक्का गुडुप्प झोपले होते. तात्यांचा आरामखुर्चीत डोळा लागला होता. स्वयंपाकघरात ताटं समोर मांडून दोघीही तशाच बसल्या होत्या. मग दादा कुठं चालले होते? कुणाला न सांगता... दादा घर सोडून तर चालले नाहीत? माझ्या डोक्यात वीज चमकली. मी एकदम दाराकडं झेप घेतली आणि त्या एवढ्या थोरल्या अंधारात वेगानं धावत सुटले.

स्टेशनच्या अर्ध्या रस्त्याला मी दादांना गाठलं, ''दादा, दादाऽऽ-'' मी मोठमोठ्यानं हाका मारत होते. दादा थांबले. माझ्याकडं आश्चर्यानं पहात राहिले.

''कुठं चाललात दादा?''